## ठाणे महानगरपालिका,ठाणे
## जाहीर आवाहन

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मिळकतींची मालमत्ता कर आकारणी ही मालमत्तेचे क्षेत्रफळ व वापराचा प्रकार (निवासी/ अनिवासी) यावर आधारभूत आहे. यानुसार मालमत्तेचे करयोग्य मूल्य निर्धारीत करुन, मालमत्ताधारकांना मालमत्ता कराची बिले दिली जातात.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम शेडयूल 'ड' प्रकरण ८ कराधान नियम ५ (१) अन्वये मिळकतीचे बांधकाम झाल्यास, मिळकतीची पुनर्बांधणी झाल्यास, अथवा मिळकतीचा वापर सुरु झाल्यानंतर मालमत्ता कर आकारणी करणेकरीता मिळकतमालक/मिळकतधारक यांनी महापालिकेस कागदपत्रासह कळविणे बंधनकारक आहे. तथापी असे असतांना जे मिळकतमालक/धारक त्यांच्या मिळकतीची माहिती महापालिकेस सादर करीत नाहीत अशा मिळकतधारकाकडून मालमत्ता कर आकारणीसाठी कागदपत्रे/माहीती मागविण्याबाबत कराधान नियम ८ (१) मध्ये तरतूद आहे.

यानुसार ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांना/नागरिकांना सुचित करण्यांत येत आहे की, ज्या मालमत्ताधारकानी त्यांच्या मालमत्तेच्या क्षेत्रफळात वाढ केली आहे / मालमत्तेची पुनर्बांधणी केली आहे / मालमत्तेच्या वापरामध्ये बदल केला आहे / मालमत्ता नव्याने विकसित केली आहे / मालमत्ता भाडेतत्वावर वापरण्याकरिता दिली आहे, तथापी अशा मालमत्तेच्या मालमत्ता कर आकारणीमध्ये सुधारणा / बदल करणेकरिता महापालिकेस कळविण्यात आले नाही. परिणामी संबंधित मालमत्तेच्या कर आकारणीमध्ये सुधारणा / बदल झालेला नाही, अशा मालमत्ता मालक /धारकांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून, त्याच्या मालमत्तेची माहिती खालील नमुन्यात **७(सात) दिवसात भरुन,** सदरील **अर्ज संबंधित प्रभाग कार्यालयात** आणि किंवा dmctax@thanecity.gov.in या ईमेल आयडीवर सादर करावा. अर्जाचा नमुना महापालिकेच्या www.thanecity.gov.in या संकेतस्थळावर download करण्याचा पर्याय दिला आहे. तसेच विनंतीनुसार संबंधित प्रभाग कार्यालयाकडील संकलन केंद्रामध्ये अर्जाचा नमुना प्रिन्ट करुन मिळेल.

जे मालमत्ताधारक विहित मुदतीत महापालिकेस कर आकारणीकरीता माहीती/ कागदपत्रे सादर करणार नाहीत, अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेस महापालिका एकतर्फी कर आकारणी करेल आणि अशा कर आकारणीस आक्षेप नोंदविणेकरिता कराधान नियम ८(३) अन्वये मालमत्ताधारकास प्रतिबंध राहील व अशी कर आकारणी मालमत्ताधारक यांचेवर बंधनकारक राहील.

मालमत्ताधारकाकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्यास आणि तद्नंतर संबंधित मालमत्तेमध्ये वाढीव बांधकाम / बांधकामाच्या वापरात बदल केल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित मालमत्तेवर ज्ञात माहितीच्या आधारे कर आकारणी करुन, देय होणा-या मालमत्ता कराच्या दुप्पट इतका कर /व्याज / दंड आकारणेत येईल, याची नोंद घ्यावी.

(ओमप्रकाश दिवटे)
उपआयुक्त (कर),
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचे मान्यतेने.

टिप : सदर सुचना प्रतिबंधीत क्षेत्रासाठी (उदा. वन जमीन इ.) मालमत्तेसाठी लागु नाही.

DMC TAX - JAHIR AAVAHAN FOR REVISE PROPERTY TAX BILL

## अर्जाचा नमुना

श्री/श्रीमती ......................
संपूर्ण पत्ता ......................
दि.: / /
मोबाईल क्र. : ......................
ईमेल आयडी : ......................

प्रति,
मा.उपआयुक्त (कर)
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

विषय : **मालमत्ता कर आकारणी करणेकरिता अर्ज**
प्रभाग समिती .............. मालमत्ता क्रमांक (PTN/Subcode) ....../.....
संदर्भ : दि. / / रोजी प्रसिध्द करण्यांत आलेली जाहीर सूचना

महोदय,

मी या अर्जात नमूद केलेल्या मालमत्तेचा मालक / धारक असून, महापालिकेमार्फत प्रसिध्द झालेल्या संदर्भीय जाहीर सूचनेच्या अनुषंगाने मालमत्ता कर आकारणी करणेकरिता, सदरचा अर्ज करीत असून, मिळकतीचा तपशील खालीलप्रमाणे--

१) मालमत्ता नव्याने विकसित केली आहे.
२) मालमत्तेमध्ये वाढीव बांधकाम केले आहे.(मजला वाढ,बाल्कनी/टेरेस आच्छादित करणे, क्षेत्रफळात वाढ व इतर)
३) मालमत्तेच्या वापरात बदल केला आहे.(निवासीचे बिगर निवासी)
४) मालमत्ता भाडेतत्वाने दिली आहे.

तरी माझी मालमत्ता प्रतिबंधीत क्षेत्रात समाविष्ठ नसल्याने माझ्या मालमत्तेची मालमत्ता कर आकारणी सुधारित करणेस विनंती आहे.

आपला विश्वासु,

सही/-
( संपूर्ण नांव )
आधार क्रमांक ..................

टिप : वरीलपैकी लागू विकल्पास( √ ) अशी खुण करावी.